दि. २५.०२.२०२५

# प्रेस नोट

**आरोपी १) सागर साहेबराव पवार, वय ३६ वर्षे, व्यवसाय नौकरी ग्रामिण गृहनिर्माण अभियंता पंचायत समिती कार्यालय कळमनुरी, २) संजय मारोतराव मोरे, वय ५२ वर्षे, व्यवयाय मजुरी, रा.कामठा ता.कळमनुरी (खाजगी इसम ) यांनी १५,०००/— रूपये लाचेची मागणी करून दिनांक २४.०२.२०२५ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान १५,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ष पोलीस स्टेशन कळमनुरी जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

---

पिडीत तक्रारदार यांनी दि. २४.०२.२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे हजर येवुन तक्रार दिली की, त्यांचे प्रधानमंत्री घरकुल आवास योजने अंर्तगत घरकुलाची पाहणी करून मंजुर घरकुलाचा दुसरा हप्ता ७०,०००/— रू तक्रारदार यांचे बॅंक खात्यावर जमा करण्यासाठी कळमनुरी पंचायत समिती, येथील ग्रामिण गृहनिर्माण अभियंता सागर पवार हे त्यांना १५,०००/— रू लाचेची मागणी करीत असल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली येथे दिली होती.

सदर तक्रारीवरून दि.२४.०२.२०२५ रोजी दोन शासकिय पंचाचे समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी पंचनामा केला. त्यामध्ये आरोपी सागर पवार यांनी तक्रारदार यांस १५,०००/— रू लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची सहमती दर्शविली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.०१ सागर पवार यांनी मागीतलेली सदर लाचेची रक्कम १५,०००/— रू हि आरोपी क्र.०२ संजय मारोतराव मोरे रा. कामठा (खाजगी इसम) यांचेकडे देणेबाबत सांगीतले. त्यामुळे आरोपी क्र.०२ यांनी सदर लाचेची रक्कम १५,०००/— रू शासकिय पंचाचे समक्ष स्वत: स्विकारली म्हणुन त्यांना पंचायत समीती कार्यालय कळमनुरी येथील घरकुल विभागामध्ये रंगेहात पकडुन ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद दोन्ही आरोपी विरूद्ध पोलीस स्टेशन कळमनुरी येथे कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. डॉ. संजय तुंगार, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक, श्री प्रफुल्ल अंकुशकर, श्री विनायक जाधव, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/तानाजी मुंढे, रविंद्र वरणे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, राजाराम फुपाटे, गजानन पवार, भगवान मंडलीक, गोविंद शिंदे, चापोह शेख अकबर, मपोह योगीता अवचार, पो.कॉ. शिवाजी वाघ, सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी ॲन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

**मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नांदेड.**
**श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबाईल क्रमांक ९८२२२५९९३२**
**टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६—२२३०५५**
**व्हॉटसॲप क्रमांक :— ९३५९१२८८८९**




**( विकास घनवट )**
पोलीस उपअधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली

CamScanner